MO.9860898564


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२२० | गुरुवार दि.०२ मे २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -220 | THURSDAY DT. 02 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |


औटे व भगत विवाह प्रसंगी उपस्थित ग्रा.पं.सदस्य विष्णु औटे,ग्रा.पं.सदस्य जगदिश औटे,विशाल चौधरी,वरबाप फौजी भगवान औटे,पत्रकार किरण जावळे,महेश औटे आदि उपस्थित होतो

# दोन पुतणे फोडून धनंजय मुंडे, जयदत्त क्षीरसागर यांच्या भेटीला





## जयदत्त अण्णा म्हणतात हात जोडा पण पाय ओढू नका

## जयदत्त क्षीरसागर यांचा निर्णय लवकरच येणार नेमका पाठिंबा कोणाला याकडे राज्याचे लक्ष

बीड /प्रतिनिधी

बीड लोकसभेचे निवडणूक भारत देशामध्ये चालू असताना महाराष्ट्र राज्याच्या राजकारणामध्ये खूप मोठे फेरफडं बदल झालेले आहेत तर याच राजकारणामध्ये आज बीड जिल्ह्याच्या इतिहासामध्ये जर पाहिले तर स्वर्गीय केशर काकू स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या विचाराला दाबून यावेळी बीड जिल्ह्यामध्ये राजकारण होत आहे का असा असावा बीड जिल्हा लोकसभा मतदारसंघातील जनतेकडून होत आहे याचवेळी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी माजी पालकमंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांची भेट घेत जे दत्तांना क्षीरसागर यांना पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी आपली सर्व ताकद लावून पंकजाताई मुंडे यांना विजयी करा अशी विनंती केली असताना यावेळी त्यांना क्षीरसागर यांनी राज्याचे कृषिमंत्री तथा बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांना बोलत असताना चर्चा सुरू असते त्यावेळी धनंजय मुंडे यांनी हात जोडून विनंती केली की जनतांना आपण महाराष्ट्राच्या राजकारणात ओबीसी समाजाचे नेते नव्हे तर मुंडे परिवाराचे आपण सदस्य आहोत आपण एकत्र राहून बीड जिल्ह्याच्या विकासाचे राजकारण करत बीड जिल्ह्याला विकासाच्या दिशेने घेऊन जाऊ आपण आपली सर्व ताकद ही बीड लोकसभेमध्ये महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी उभा करावी अशी विनंती करण्यासाठी धनंजय मुंडे यांनी हात जोडले असताना जयदत्त क्षीरसागर माजी पालकमंत्री यांनी धनंजय मुंडे यांना बोलत असताना मधातच एक टोला मारला तो टोला म्हणजे असा होता की नक्कीच आपण बहिणीसाठी हात जोडत आहात फक्त हातच जोडून मत मागा बहीण नक्कीच विजय होईल माझ्या शुभेच्छा आहेत पण हात जोडत असताना कोणाचाही पाय ओढू नका असाही टोला माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी धनंजय मुंडे यांना लगावला याचवेळी धनंजय मुंडे व जयदत्त क्षीरसागर यांच्यामध्ये बंद दारावर चर्चा झाली असताना या चर्चेमधून सत्य बाहेर आलं नाही किंवा येणार आहे अशी चर्चा बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये चालू आहेत परंतु धनंजय मुंडे यांना जयदत्त क्षीरसागर यांनी अजून माझी भूमिका ही स्पष्ट नाही मी सर्वांना विचारात घेऊन माझी भूमिका स्पष्ट करणार आहे असेही प्रकारचे उत्तर देतात त्यांना क्षीरसागर यांनी धनंजय मुंडे ला दिले व धनंजय मुंडे यांना निराशा पोटी त्या ठिकाणाहून बाहेर येऊन सरळ यशोदा हॉटेल गाठत तिथून पुढची राजकीय चर्चा ही फोनवरून झाल्याची विश्वासने सूत्रांची माहिती आहे परंतु जयदत्त क्षीरसागर यांनी धनंजय मुंडे यांना कुठल्याही प्रकारचं हो किंवा नाही मध्ये उत्तर दिलेलं नाही बघतो सांगतो

बीड लोकसभेच्या निवडणुकीमध्ये आज सुद्धा पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांनी एकत्र येत निवडणूक लढविण्याची लोकसभेमध्ये नव्हे तर महाराष्ट्रामध्ये बहीण भावाचं राजकारण यानंतर एकत्र चालू राहणार आहे याच पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी देदना यांची भेट घेतली. खरी पार्श्वभूमी म्हणजे धनंजय मुंडे व पंकजा मुंडे यांचे महाराष्ट्रामध्ये आता वेगळ्या पद्धतीचा राजकारण येणाऱ्या लोकसभा नंतर विधानसभेला पाहायला मिळणार आहे परंतु आज कार्यकर्ता असेल किंवा राजकीय नेते मंडळी जे एकमेकांचे विरोधक होते सर्वसामान्य कार्यकर्त्यांमुळे हे नेते आज मोठ्या संख्येने महाराष्ट्रामध्ये मिरवत आहेत परंतु याच ठिकाणी अनेक कार्यकर्ते हे नाराजीचा सूर दाखवत असतानाच धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळामध्ये झालेला निधी वाटपामध्ये दुधा भाव सह अन्य काही कारणामुळे धनंजय मुंडे यांच्या वरती नाराज असलेला गट व पंकजाताई मुंडे यांच्यावर ती नाराज असलेला एक गट्टा मतदार कार्यकर्ता महाविकास आघाडीच्या पाठीशी उभा राहत असल्याने पंकजाताई मुंडे यांच्या साठी धनंजय मुंडे ची धावपळ ही प्रयत्न करत आहे.

दोन-तीन दिवसांपूर्वी माझी पालकमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी एमआयडीसीतील विश्व दत्त लॉन्स येथे सर्व समर्थकांची बैठक बोलावली होती या बैठकीमध्ये सभेच्या अनुषंगाने खजुराच्या संख्येने जयदत्त क्षीरसागर यांना मानणारा बीड जिल्ह्यातील मतदार व कार्यकर्ता त्या ठिकाणी उभा होता याचवेळी सर्वांची एक मुखाने मागणी ही महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांची तुतारी वाजवा तर यावेळी काहीजण कमळाला साथ द्या अशी ही चर्चा निघाली परंतु यावेळी मागासवर्गीय समाज सुद्धा वंचितला साथ द्या अशी ही चर्चा त्या ठिकाणी निघाली परंतु या सर्व कार्यकर्त्यांचे म्हणणे येणाऱ्या काळामध्ये महाविकास आघाडी का महायुतीचा उमेदवार कोणाच्या पाठीशी उभा राहणार किंवा वंचितच्या उमेदवाराला येत तसेसागर माजी पालकमंत्री यांचे बळ मिळणार या उमेदवाराला यांचे बळ मिळेल तोच उमेदवार यावेळी नक्कीच विजय होईल जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे दोन द्याळीच लाख मतदान बीड जिल्ह्यामध्ये फिरवण्याची क्षमता असणारा ओबीसी समाजाचे नेतृत्व व बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये मोठा नाव असलेले माजी पालकमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे पाहिले जात आहेत परंतु जयदत्त क्षीरसागर हे नेमकं भाजप का राष्ट्रवादी का वंचित कोणत्या पक्षाला साथ देतात व येणाऱ्या काळामध्ये दोन दिवसांमध्ये आपला निर्णय कळतील हा प्रश्न सर्वच उमेदवारांना पडला आहे की जगताना यांनी आपल्यालाच मदत करावी.

तर त्या ठिकाणी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार बीड विधानसभेचे अध्यक्ष डॉ योगेश शिरसागर यांना जेव्हा राष्ट्रवादी शरद पवार गट एकत्र असताना संदीप क्षीरसागर यांना फोडून उपमुख्यमंत्री अजित पवार व धनंजय मुंडे यांनी जयदत्त क्षीरसागर यांना विरोध करण्याचे काम यावेळी केले खर परंतु त्यानंतर राष्ट्रवादी कुठून जयदत्त क्षीरसागर यांचे दुसरे पुतणे हे अजित दादा पवार गटांमध्ये गेले त्यावेळेस सुद्धा धनंजय मुंडे यांनीच दोन्ही पुतण्यांना फोडण्याची चर्चा सध्या बीड शहरांमध्ये जो धरू लागली आहे दोन्ही पुतणे पडून जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे मताची बेरीज करून मदतीला धावून जाणारा पंकजाताई मुंडे यांचा भाऊ व बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे हे नेमके त्यांना काय बोलले असतील व काय चर्चा झाली असेल अशीही चर्चा लागली आहे.

# पंकजाताई मुंडेंच्या प्रचारार्थ परळी मतदारसंघांत भाजप, राष्ट्रवादी काँग्रेससह महायुतीचे कार्यकर्ते सरसावले

## कॉर्नर बैठका, अन् घरोघरी मतदारांना प्रत्यक्ष भेटून काढत आहेत ग्रामीण भाग पिंजून

## लेकीसाठी जीवाचे रानं करु; विक्रमी मताधिक्य देण्याचा मतदारांचा निर्धार

परळी (प्रतिनिधी)

भाजपा-महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ भाजप, राष्ट्रवादी काँग्रेससह महायुतीच्या प्रमुख पदाधिकार्यांनी विधानसभा मतदारसंघनिहाय प्रचार यंत्रणा गावोगावी सक्रिय केली असून मतदारसंघ पिंजून काढला आहे. महायुतीचे घटक पक्ष असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तसेच शिवसेना, रासप, रिपाइं, मनसे या सर्व पक्षांच्या प्रमुख पदाधिकार्यांनी मतदार संघातील जिल्हा परिषद सर्कलनिहाय गावा-गावातील घरोघरी जावून मतदारांपर्यंत पोहचले आहेत. ठिकठिकाणी मतदारांचा पंकजाताईंच्या नेतृत्वाला प्रचंड मोठा प्रतिसाद मिळत आहे. 'लेकीसाठी जीवाचे रान करु; विक्रमी मताधिक्य देवू' असा निर्धार मतदारांनी व्यक्त केल्याने महायुतीच्या पदाधिकार्यांचा प्रचाराचा उत्साह आणखी दुणावला आहे.

पंकजाताई मुंडे यांच्यासाठी महायुतीचे शहर व ग्रामीण भागातील कार्यकर्ते कंबर कसून कामाला लागले आहेत. शहरा पाठोपाठ गेल्या तीन दिवसांपासून ग्रामीण भागात त्यांनी प्रचाराचा जोर वाढवला आहे. महायुतीचे पदाधिकारी ठिकठिकाणी बैठका, गाठीभेटी,पदयात्रा काढत असून याला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कार्यकर्ते गावा-गावात जावून पंकजाताईंचे बीड जिल्ह्याचे विकासाचे व्हिजन हे पदाधिकारी मतदारांना सांगत त्यांना विकसित बीड जिल्ह्यासाठी पंकजाताई मुंडे यांच्या विजयासाठी मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. भाजपला मत म्हणजे विकासाला मत आहे हे सूत्र समोर ठेवून तुम्ही सर्व सुज्ञ मतदारांनी पंकजाईंना एक संधी द्यावी असे आवाहन केले जात आहेत. दरम्यान आपली लेक जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार या भावनेतून गावोगावच्या ग्रामस्थांत समाधान व्यक्त होत असून विक्रमी मताधिक्य देवू असा विश्वास मतदार देत आहेत. तालुक्यातील सिरसाळा, पिंपरी, दादाहरी वडगाव, धर्मापूरी, जिरेवाडी, नागापूर तसेच अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर, बर्दापूर, पट्टीवडगाव, राडी आदी जिल्हा परिषद गटात या पदाधिकार्यांनी पंकजाताईसाठी जोरदार प्रचार सुरु केला आहे. घरोघरी जावून मतदारांशी प्रत्यक्ष संवाद हे पदाधिकारी साधत आहेत. ठिकठिकाणच्या गावांमध्ये पंकजाताईंना मोठे मताधिक्य देण्याचा विश्वास मतदार व्यक्त करत आहेत.जिल्ह्याचा सर्वांगीण



विकास समोर ठेवून मतदारांनी इतर कोणत्याही अपप्रचाराला बळी न पडता भाजपला मतदान करावे. तुमची प्रतिनिधी म्हणून संसदेत काम करताना पंकजाताई मुंडे या प्रत्येक मत विकासासाठी कामी लावतील. आगामी काळात जिल्ह्याच्या ठिकाणी मोठे हॉस्पिटल उभारणी करण्याबरोबरच उद्योग- व्यापार वाढवून दहा हजार तरुणांना जिल्ह्यातच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पंकजाताई काम करणार आहेत.याशिवाय विकसित जिल्हा म्हणून जे-जे केंद्र सरकारच्या माध्यमातून करणे शक्य होईल ती कामे पंकजाताईंच्या माध्यमातून पुर्ण होतील. त्यामुळे येत्या १३ मे रोजी कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन महायुतीचे पदाधिकारी करत आहेत.




## जय्यत तयारी अँड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या सभेची

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभा उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ दि. ०३ मे २०२४ अंबाजोगाई शहराततील मोढा मार्केट मैदान या ठिकाणी सायंकाळी पाच वाजता प्रचार सभा होत आहे. त्या निमित्ताने जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची नियोजन बैठक पार पडली, या बैठकीमध्ये गाव, तांडा, वाडी वस्ती मधील जास्तीत जास्त लोक, अंबाजोगाईतील सभेला कशा पद्धतीने उपस्थित राहतील यासाठी नियोजन करण्यात आले. रेकॉर्ड ब्रेक करणारी ही सभा घेण्यात येईल असा निर्धार व माहिती उपस्थित सर्वच पदाधिकारी कार्यकर्त्यांनी या बैठकीत बोलताना सांगीतले त्यामध्ये उमेदवार अशोक हिंगे पाटील सह पूर्व विभागाचे जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे,मिलिंद घाडगे, धम्मनंद साळवे,अंकुश जाधव,अजय सरवदे पुरुषोत्तम वीर, बालाजी जगतकर, धम्मनंद कासारे ,चंद्रकांत खरात,सचिन उजगरे,अनिल डोंगरे,बालासाहेब जगतकर, बाबुराव मस्के ,अरुण बनसोडे,शेख खाजाभाई,डॉ.संजय नाकलगावकर,गोविंद मस्के,गौतम साळवे,गफार शाह,अनिल कांबळे,अमोल हातागळे,अविनाश झोडगे,बाबासहेब मस्के,प्रेम जगतकर,रवी सिरसठ,मारूती सरवदे,राम सरवदे,रामभाऊ उदमले व सर्व तालुक्यात व शहरातील पदाधिकारी उपस्थित होते.




**लोकनेते शहाजीराव पाटील विद्यालय बोराटवाडी मध्ये आज १ मे महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. चाकाटी गावचे माजी सैनिक श्री.नामदेव पडळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य श्री.भिमराव आवारे सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी सरपंच श्री.दत्तू आण्णा सवासे,दुधगंगाचे संचालक श्री.दयानंद गायकवाड श्री.हेमंत सुद्रिक, श्री.भाऊसाहेब इंगवले,श्री.लालासाहेब हेगडकर,श्री.देविदास सवासे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.अमर निलाखे सर यांनी केले.तर आभार श्री.शशिकांत गायकवाड सर यांनी मानले.**

## धनंजय मुंडेंनी बाहेगव्हाण येथे केले मस्के कुटुंबियांचे सांत्वन

### दिनेशच्या अकाली निधनाने माझा एक सच्चा सहकारी नियतीने हिरावला - मुंडेंनी व्यक्त केल्या भावना



वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिनेश मस्के यांचे नुकतेच अकाली निधन झाले असून, आज राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण येथे जाऊन मस्के कुटुंबियांचे सांत्वन केले. दिनेश हा माझा एक सच्चा सहकारी होता. दिनेशच्या आजाराबद्दल मला कल्पना होती, सर्वांनी खूप प्रयत्न केले परंतु त्याला दुर्दैवाने यश आले नाही. दिनेशच्या अकाली निधनामुळे माझा एक सच्चा सहकारी नियतीने हिरावून घेतला आहे, अशा भावना यावेळी धनंजय मुंडे यांनी व्यक्त करत स्व.दिनेश मस्के यांना श्रद्धांजली अर्पण केली.यावेळी मा.आ.केशव दादा आंधळे, मोहनराव जगताप, शेषेराव जगताप, नितीन नाईकनवरे, नारायण शिंदे, भारत जगताप, सुग्रीव मुंडे, सतिश बडे यांसह आदी उपस्थित होते.

## परळी शहरातील विविध समाज घटकांच्या बैठकीत खा. प्रितमताईंना मतदारांची ग्वाही सुवर्णकार समाज, भावसार समाजासह वकील संघाचा पंकजाताईंना बिनशर्त पाठींबा

# पंकजाताई मुंडे यांना लोकसभेत पाठवणे आमची नैतिक जवाबदारी

परळी (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील सर्वसमाज घटकांना एकत्र करून विकासाची विविध लोकाभिमुख कामे केल्यामुळे पंकजाताईंच्या माध्यमातून राज्यात आणि देशात परळीचे नाव उंचावले आहे. राज्याच्या मंत्री म्हणून काम करताना लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या प्रमाणे सर्वांना सोबत घेऊन वंचित, उपेक्षित, दुर्लक्षित घटकांना पंकजाताईंनी न्याय देण्याचं काम केल आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, जलयुक्त शिवार, महिला बचत गट इत्यादी योजनांच्या माध्यमातून आम्हाला नवी ओळख मिळवून देणाऱ्या कर्तबगार लेकीला परळीकर म्हणून लोकसभेत पाठवण्याची नैतिक जवाबदारी आमची आहे आणि ही जवाबदारी आम्ही नेकीने पार पाडू अशी ग्वाही परळी शहरातील मतदारांनी खा. प्रितमताई मुंडे यांना दिली.

भाजप आणि महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारानिमित्त खा. प्रितमताई मुंडे यांनी परळी शहरातील वकील संघ, सुवर्णकार समाज आणि भावसार समाजाच्या बैठकीत मतदारांशी संवाद साधला. विकासाचा दृष्टिकोन आणि नेतृत्व करण्याची सक्षमता असलेल्या उमेदवार म्हणून पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी मतदानरुपी आशीर्वाद उभे



करून लोकसभेच्या विजयात मताधिक्याच योगदान दया असे आवाहन खा. प्रितमताई मुंडे यांनी केले.

दरम्यान परळी शहरातील भावसार समाजातील प्रतिष्ठित नागरिकांनी पंकजाताई मुंडे यांना बिनशर्त पाठींबा देऊन संपूर्ण जिल्ह्यातून शंभर टक्के मतदान मिळवून देऊ असा शब्द भावसार समाजाच्या वतीने दिला. तर सुवर्णकार समाजाने पंकजाताई मुंडे यांना पाठींबा देऊन परळीच्या लेकीला सन्मानजनक मताधिक्य देऊन लोकसभेत पाठवण्याचा निर्धार व्यक्त केला.

सुज्ञ मतदार पंकजाताईंच्या विकासाभिमुख नेतृत्वासोबत

परळी वकील संघाच्या बैठकीत शहरातील जेष्ठ विधिज्ञांनी वकील संघ पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी असल्याचे सांगताना जातीपातीच्या राजकारणाला थारा न देता परळीच्या लेकीला सन्मानजनक विजय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. बीड जिल्ह्यातील सुज्ञ मतदार हा नेहमीच विकासाच्या मुद्द्यावर सक्षम नेतृत्वाच्या पाठीशी राहिला आहे, उमेदवाराची नेतृत्व क्षमता, विकासाचे ध्येयधोरण, भविष्याची गरज बघून मतदान करणारा वर्ग पंकजाताईंच्या पाठीशी आहे, सर्वांगीन विकासाचे व्हिजन असलेल्या उमेदवार म्हणून सुज्ञ मतदार पंकजाताईंच्या विकासाभिमुख नेतृत्वासोबत असल्याची भावना या बैठकीतून पुढे आली.

# कवी, लेखकांच्या लिखाणातून भवताल दिसावा - बाबाराव मुसळे

शिरूर कासार (प्रतिनिधी)

एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय दुसरे ऑनलाईन काव्य संमेलन मंगळवार दि.३० एप्रिल रोजी संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी विदर्भातील जेष्ठ साहित्यिक मा.बाबाराव मुसळे होते तर संमेलनाचे उद्घाटन मराठवाड्यातील गोड गळ्याचे कवी मा.दिनकर जोशी यांनी केले. एकताचे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड, प्रदेश संघटक देवीदास शिंदे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षपदावरून बोलतांना मा.मुसळे म्हणाले की हल्ली लिहिणारांची संख्या अधिक दिसून येत असली तरी या लेखकांच्या लिखाणातून त्यांच्या परिसरातील प्रश्न, समस्यांचे दर्शन हव्या तितक्या प्रमाणात होत नाही ही चिंताजनक बाब असून एसीमध्ये बसून शेतीमातीचे प्रश्न प्रभावीपणे मांडता येत नसतात.

संमेलनाचे उद्घाटन करतांना कवी दिनकर जोशी यांनी साहित्यिकांनी सकस लिखाण करत समाजाला योग्य दिशादर्शन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. काव्य संमेलनात बाबाराव मुसळे (वाशीम), दिनकर जोशी (अंबाजोगाई), वर्षा किडे-कुळकर्णी (नागपुर), विद्या लटपटे (परभणी), शैलजा कारंडे (लातूर), गणेश शिवलाड (परभणी), प्रिती टेकाळे (बीड), नागोराव सोनकुसरे (नागपुर) आदी कवींनी सहभाग नोंदवत अतिशय सुरेख रचना सादर करून रसिक श्रोत्यांना अक्षरशः दोन तास खिळवून ठेवले. एकता फाउंडेशन चे युवक प्रदेश निमंत्रक इम्रान शेख (अहमदनगर) यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन रामनाथ पानखडे (पुणे) आणि आभार प्रदर्शन एकताचे संस्थापक सदस्य शिवचरित्रकार कैलास तुपे (बीड) यांनी केले.

काव्य संमेलनात एकता फाउंडेशन चे कोशाध्यक्ष शिवलिंग परळकर, संस्थापक सदस्य व्यंगचित्रकार दिपक महाले, महिला आघाडीच्या लता बडे, एकता फाउंडेशन परभणी जिल्हा महानगरीय अध्यक्षा प्रा.शोभाताई घुंगरे आदी मान्यवरांसह महाराष्ट्रभरातील कवी, लेखकांची उपस्थिती होती.

# संविधान बचाव, राष्ट्र बचाव अंतर्गत बीड येचे ४ मे रोजी बुद्धीजीवी वर्ग, सामाजिक संघटनाची बैठक

बीड (प्रतिनिधी)

संविधान बचाव, राष्ट्र बचाव अंतर्गत बीड येथे ४ में २०२४ रोजी सोय ०५:००वा.निलकमल होटेल सभागृह येथे सर्व बुद्धीपीवी वर्ग, सहित्यीक, लेखक, विद्याथीसंघटना व सामाजिक संघटनाच्या प्रतिनिधीची बैठक आयोजित करण्यात आली आहे, तरी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सविधान रक्षकानी केले आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गेली दहा वर्षात लोकशाहीच्या नावा खाली बहुमताच्या जोरावर देशात अद्योषीत हुकुमशाही सुरु आहे, सरकारचा विरोधात राष्ट्रहितासाठी, जनतेचा प्रश्नावर आवाज उठवला तर सरकारी एजन्सीचा दुरुपयोग करून विरोधकाचा आवाज दाबला जात आहे, लोकशाहीचे चार स्तंभ गुलाम करून ठेवण्यात आले आहे. त्यामुळे लोकशाहीला धोका निर्माण झालेल आहे, त्यामुळे लोकशाही व्यवस्था उलथाउन टाकण्यासाठी सविधान बदलल्याचे षडयंत्र सुरु आहे, तर या निवडनुकीत जातीयवादी पक्षाला बहुमत मिळाले तर, संविधान बदलले जाऊ शकते. आमच्या सारख्या बुद्धीजीवी सामजिक कार्यकत्या समोर देश जळत असताना आम्ही शांत राहणे हे राष्ट्रहितासाठी घातक आहे. सविधान वाचवुन लोकशाही बळकट करण्यासाठी एक दिलाने काम करावे लागेल व संविधान विरोधी शक्तीला पराभूत करावे लागेल तरच सामान्य जनतेचे अधिकार आबाधित राहतील, यावर विचारविनिमय करून निर्णय घेण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे, तरी बहुसंख्येने या बैठकी उपस्थित रहावे

# राष्ट्रीय समाज पक्षाची बीड येथे जिल्हास्तरीय बैठक संपन्न

## बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना निवडून आणण्यासाठी रासपची टीम जोमाने काम करणार, प्रा,चौरे प्रा, मतकर

बीड (प्रतिनिधी)

अठरापगड जातींना घेऊन चालणारे हे नेतृत्व आहे त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व जाती धर्माच्या लोकांनी विकासासाठी ताईंना निवडून द्यावे देशामध्ये माननीय नरेंद्र मोदी साहेबांच्या नेतृत्वाखाली देशात सत्ता स्थापन होणार आहे, त्यामुळे आपण बीडचा खासदार हा भारतीय जनता पक्षाचा निवडून द्यायचा आहे कारण की येणाऱ्या काळात बीड जिल्ह्याचा जो विकास थांबला आहे ,आणि जो पुढे करायचा आहे उदा. रेल्वेचा प्रश्न असेल रस्त्याचे प्रश्न असतील शेतकऱ्यांचे प्रश्न असतील पाण्याचा प्रश्न असेल असे वेगवेगळ्या माध्यमातून विकास कामे खेचून आणण्यासाठी सत्तेतील खासदार असणे आवश्यक आहे आपण सत्ते विरोधी खासदार निवडून दिला दिला तर विकास थांबेल पुन्हा जिल्हा दहा वर्षे पाठीमागे जाईल कारण की बीड जिल्हा हा दुष्काळी जिल्हा ऊसतोड कामगाराचा जिल्हा म्हणून ओळखला जातो आपल्याला ताईच्या माध्यमातून ही ओळख पुसण्याचा प्रयत्न करायचा आहे त्यामुळे राष्ट्रीय समाज पक्ष हा ताईच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहील व इथून पुढचा सर्व वेळ देणार आहे

उपस्थित श्री महेश चौरे सर श्री अण्णासाहेब मतकर श्री भगवान माने श्री परशुराम काशीद सो किरण डोळस. गवळी रामेश्वर बाळासाहेब सापणकर विनायक वाणी लगास.सातपुते बालाजी भाऊ दिंडे कल्पेश भोंडवे. नवनाथ मुळे मुळे मुळे रामदास बालाजी काळे अशोक हप्ते. अविनाश काकडे. शिंदे नितीन मोहन खेमाडे भाऊसाहेब येळे आबा बोडके. काळे पिठ्ठी. शिवकन्या वीर इतर सर्व कार्यकर्ते पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते,



# वोट देणार त्यासोबत नोटही देणार !

## राडी सर्कल मधील ग्रामस्थांनी केला अशोक हिंगे यांना विजयी करण्याचा संकल्प

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड लोकसभा निवडणूक वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांची ग्रामीण भागामध्ये दिवसेंदिवस क्रेझ वाढू लागली असून आता तर नागरिकांनी नोट बरोबर वोटही देणार असा संकल्प करीत अशोक हिंगे पाटील यांना बीड लोकसभा निवडणुकीत विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.



याची सुरुवात राडी सर्कलमधील ग्रामस्थांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मधील शिल्लक राहिलेली देणगी २१ हजार रुपये अशोक हिंगे पाटील यांना निवडणुकीसाठी देणगी म्हणून देऊन केली आहे.बीड लोकसभा निवडणुकीमध्ये दुरंगी लढत होणार असल्याच्या वल्गना केल्या जात असल्या तरी ही लोकसभा निवडणूक तिरंगी होणार असल्याचे आता नागरिकांमधून बोलले जात आहे. अशोक हिंगे पाटील यांची क्रेझ दिवसेंदिवस वाढत चालली असून नागरिकांनीच अशोक हिंगे पाटील यांना विजयी करण्यासाठी प्रचार सुरू केला असल्याचे चित्र सर्वत्र दिसू लागले आहे. याचाच एक भाग म्हणजे अशोक हिंगे पाटील हे अंबाजोगाई तालुक्यातील राडी सर्कल मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ध्वजारोहण करण्यासाठी गेले असता येथील ग्रामस्थांनी अशोक हिंगे पाटील यांचे जोरदार स्वागत करत अशोक हिंगे पाटील यांना निवडून देण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. वोट तर देणारच त्याबरोबरच नोटही देणार! असे म्हणत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मधील शिल्लक राहिलेली देणगी रुपये २१,०००/- अशोक हिंगे पाटील यांना निवडणूक देणगी म्हणून बहाल केली. यामुळे बीडची लोकसभा निवडणूक तिरंगी होणार हे निश्चित झाले आहे.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, युवा नेते अजय सरवदे, युवा तालुकाध्यक्ष अनिल कांबळे, जिल्हा सचिव अरुण बनसोडे, जिल्हा सचिव परमेश्वर लांडगे, शहराध्यक्ष अमोल हातागळे, जिल्हा उपाध्यक्ष अस्लम पठाण, प्रसिद्धी प्रमुख अविनाश घणघावं, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अजय वाघमारे, तालुका उपाध्यक्ष प्रदीप वाघमारे,तालुकाध्यक्ष खाजमिया पठाण, सरपंच प्रशांत गंगणे, उपसरपंच नीलकंठ गंगणे, बबरूवान बनसोडे, सदस्य उमेश गंगणे, नितीन वाघमारे, सिद्धार्थ बनसोडे, बाळासाहेब गंगणे आदी उपस्थित होते.



वडवणी बाजार समितीचे सभापती दिनेशराव मस्के पाटील यांचे दुःखद निधन झाले असता त्यांच्या बाहेगव्हाण येथील निवासस्थानी मस्के कुटुंबाचे सांत्वन करून प्रतिमेला अभिवादन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप,सचिन भैया मुळूक,नगराध्यक्ष शेषेराव बापू जगताप,सुनील दाजी सुरवसे,नगरसेवक नागेश डिगे,शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे बीड जिल्हा प्रमुख ओमराजे जाधव दिसतं आहेत.( वडवणी : गितांजली लव्हाळे )

# मौलाना आझाद उर्दू शाळेचे शिक्षक जाहिरोदिन युसुफोदिन फारोकी यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

केज । प्रतिनिधी

केज शहरातील मौलाना आझाद उर्दू शाळेचे शिक्षक जहिरोद्दिन युसुफोद्दिन फारोकी हे सेवानिवृत्त झाले आहेत याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला.यावेळी झालेल्या अध्यक्ष नुरोद्दिन इनामदार व संस्थेचे सचिव डॉ जलालोद्दिन बनेमिया इनामदार यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.





तसेच मौलाना आझाद उर्दू प्रथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका शेख रुक्साना बेगम यांचाही सेवागौरव सत्कार


या प्रसंगी प्रमुख उपस्थीत इनामदार मुजफारोद्दिन,शेख शाकेर टेलर,खुरेशी मुबीन सेठ,सुरेश मस्के,इनामदार कलीमोद्दिन,तसेच शेख रुकसाना बेगम या मुख्याध्यापिका पादवरुन निवृत्त झाल्याबद्दल त्यांच्या सेवेचा गौरव करण्यात आला. हा कार्यक्रम बुधवार दिनांक एक मे रोजी नुरजहाँ उर्दू माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सिद्धिकि फिरदोसिया बेगेम यांचे हास्ते पुष्पगुच्छा देऊन सत्कार करण्यात आला.त्यांचे जागी अदर्श शिक्षक खतीब अमजददोदोन यांना मुख्याध्यपक पदी नियुक्त करण्या आले त्यांचा त्यावेळी सर्व संचालक मंडळ शिक्षक वर्ग ने सत्कार केले पुढील कमासाठी शुभ इच्छा दिले सेवानिवृती झालेल्या फारोकी जहिरोद्दिन यांनी सांगितले की सेवेतून निवृत होऊन समाज सेवेत सक्रिय राहावे, पुढील जीवनामध्ये उर्वरित इच्छा पुर्ण कराव्यात, शाळेप्रती असलेली आपली निष्ठा आजच्या कार्यक्रमाच्या उपस्थितांच्या संख्येवरून सिद्ध होते असे सत्काराला उत्तर देताना फारोखी जहिरोदिन म्हणाल्या. या ठिकाणी केलेल्या सेवेचे दिवस कायम स्मरणात राहतील असे सांगून सर्वांचे कृतज्ञता व्यक्त केली.शिक्षक समाजसेवेचा एक घटक असतोअशा .भावना .व्यक्त .केल्या .सेवाकाळातीलआठवणी .बोलताना .जागवल्या .या .कार्यक्रमास .विद्यार्थी,पालक ,शिक्षण प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.


# पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत गुरुनानक प्राथमिक विद्यालयाचे यश !

केज : प्रतिनिधी

श्री विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ,सारणी (सां.) ता. केज जि. बीड संचालित गुरुनानक प्राथमिक विद्यालय,शाहूनगर बीड मधील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादित केले आहे.

इयत्ता पाचवीचे विद्यार्थी चि. गदळे अनुष राजेश आणि चि. मस्के अजिंक्य अंगद यांनी या परीक्षेत उत्तम कामगिरी पार पाडत पात्र ठरले आहेत. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या प्रगतीत आणखी एक मानाचा तुरा खोवल्या गेला आहे. शाळेत चालू अभ्यासक्रमाबरोबरच नवोदय, स्कॉलरशिप,ऑलिम्पियाड व इतर स्पर्धा परीक्षेचे नियमित तास व विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असल्यामुळे यशाचा मार्ग विद्यार्थ्यांसाठी सुकर होतो असे प्रतिपादन शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पवार एस. ए.यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत असताना केले.परीक्षेस बसलेल्या इतर विद्यार्थ्यांनी देखील भरपूर मेहनत घेतली ,यश मिळणं नव्हे तर ध्येयाच्या दिशेने न थांबता वाटचाल करीत राहणं महत्वाचं असे म्हणत शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री राजेशजी गदळे सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे प्रोत्साहन वाढविले. विद्यार्थ्यांच्या या यशात इयत्ता पाचवीच्या वर्गशिक्षक श्रीमती मुंडे सविता यांचे तसेच विषय शिक्षक श्रीमती पव्हणे प्रीती,श्रीमती डोंगरे





उज्वला,श्री ठोकरे महेश यांचेही योगदान उल्लेखनीय आहे.सहशिक्षक श्री तेलप सर,श्रीमती हांगे मॅडम,श्री तांदळे यांनीही विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे.

अनुष गदळे आणि अजिंक्य मस्के यांनी व इतर विद्यार्थ्यांनी रामानुजन मॅथ्स ऑलमपीयाड या परीक्षेत गोल्ड मेडल मिळवले आहेत .त्यांच्या या सुंदर यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री विक्रम (बप्पा) मुंडे ,श्री कृष्णा अर्बन को. ऑप.बँकेचे चेअरमन आणि आमचे मार्गदर्शक मा.विजयकांत (भैय्या) मुंडे, मा. अतुल(दादा) मुंडे (सरपंच,देवगाव) त्याचबरोबर संस्थेतील सर्व पदाधिकऱ्यांनी तसेच परिसरातील पालक आणि मित्र आप्तेष्ट यांनी अनुष आणि अजिंक्य वर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जगाचे प्रेरणास्त्रोत-डॉ.हनुमंत सौदागर

कळमआंबा येथे भीम जन्मोत्सव उत्साहात !

केज । प्रतिनिधी

जगात जिथे -जिथे अन्याय अत्याचार होतात तिथे तिथे त्या शोषित वंचित लोकांचं लढाईचं बळ आणि प्रेरणा डॉ बाबासाहेब आंबेडकर होत जातात असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते कळंबआंबा येथील भिम जन्मोत्सव कार्यक्रमात व्याख्याते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच शशिकांत इंगळे,प्रा.डॉ बाबासाहेब हिरवे, इब्राहीम चाचा पठाण, उपसरपंच डिगांबर वाघमारे,रिपाई चे तालुकाध्यक्ष सुनिल हिरवे माजी सरपंच सतिश इंगळे,राजकुमार मुसळे ,विलास लोढे आदींची उपस्थिती होती. उपस्थितांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शासकीय सेवेत रुजू होत असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. डॉ बाबासाहेबांच्या जीवनावर विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.पुढे बोलताना डॉ सौदागर म्हणाले डॉ बाबासाहेबांचे विचार आत्मसात करून समाजाची उन्नती होईल. शेतकरी , उपेक्षित, वंचित,महिला सर्व घटकांसाठी केलेले कार्य त्याचे पैलू समजून घेतले पाहिजेत.विचारधन ही देणगी आहे. जयंती महोत्सवातून उद्याची पिढी चांगली घडली पाहिजे असे मत व्यक्त केले. प्रा डॉ हिरवे यांनी यावेळी विचार मांडले.विलास लोंढे यांनी उर्जादायी विचार मांडले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष दुर्योधन हिरवे,उपाध्यक्ष धम्मानंद हिरवे,सचिव बालासाहेब घाडगे,रजनीश गायकवाड,सुंदर घाडगे,इंद्रजित घाडगे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज हिरवे यांनी केले तर आभार हिरवे यांनी मानले.





कोरोना काळात स्वतःच्या जीवाची परवा न करता रुग्णांची सेवा केलेली पिंपरी घाटा येथील डॉक्टर बाळासाहेब गिरी यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना गाठा येथील सरपंच प्रल्हाद मुळीक पत्रकार सुरेश कांबळे संदीप शिंदे गुंड खाडे सर बाळासाहेब कांबळे आधी मित्रपरिवार

# राष्ट्रीय समाज पक्षाची बीड येथे जिल्हास्तरीय बैठक संपन्न

## बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना निवडून आणण्यासाठी रासपची टीम जोमाने काम करणार, प्रा,चौरे प्रा, मतकर,

बीड ।प्रतिनिधी

अठरापगड जातींना घेऊन चालणारे हे नेतृत्व आहे त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व जाती धर्माच्या लोकांनी विकासासाठी ताईंना निवडून द्यावे देशामध्ये माननीय नरेंद्र मोदी साहेबांच्या नेतृत्वाखाली देशात सत्ता स्थापन होणार आहे, त्यामुळे आपण बीडचा खासदार हा भारतीय जनता पक्षाचा निवडून द्यायचा आहे कारण की येणाऱ्या काळात बीड जिल्ह्याचा जो विकास थांबला आहे ,आणि जो पुढे करायचा आहे उदा. रेल्वेचा प्रश्न असेल रस्त्याचे प्रश्न असतील शेतकऱ्यांचे प्रश्न असतील पाण्याचा प्रश्न असेल असे वेगवेगळ्या माध्यमातून विकास कामे खेचून आणण्यासाठी सत्तेतील खासदार असणे आवश्यक आहे आपण सत्ते विरोधी खासदार निवडून दिला दिला तर विकास थांबेल पुन्हा जिल्हा दहा वर्षे पाठीमागे जाईल कारण की बीड जिल्हा हा दुष्काळी जिल्हा ऊसतोड कामगाराचा



जिल्हा म्हणून ओळखला जातो आपल्याला ताईच्या माध्यमातून ही ओळख पुसण्याचा प्रयत्न करायचा आहे त्यामुळे राष्ट्रीय समाज पक्ष हा ताईच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहील व इथून पुढचा सर्व वेळ देणार आहे

उपस्थित श्री महेश चौरे सर श्री अण्णासाहेब मतकर श्री भगवान माने श्री परशुराम काशीद सो किरण डोळस. गवळी रामेश्वर बाळासाहेब सापणकर विनायक वाणी लगास.सातपुते बालाजी भाऊ दिंडे कल्पेश भोंडवे. नवनाथ मुळे मुळे मुळे रामदास बालाजी काळे अशोक हप्ते. अविनाश काकडे. शिंदे नितीन मोहन खेमाडे भाऊसाहेब येळे आबा बोडके. काळे पिठ्ठी. शिवकन्या वीर इतर सर्व कार्यकर्ते पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# उमापूर येथे गावठी हातभट्टी दारूचा अड्डा केला उध्वस्त

## स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई; १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या गावठी हातभट्टी दारू निर्मिती करणारे, अवैध देशी विदेशी दारू विक्री करणारे तसेच त्याची वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने विशेष मोहीम राबवून कायदेशीर कारवाईची मोहीम हाती घेतली आहे.

चकलांबा पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या उमापूर पोलीस चौकीच्या परिसरातील गणेश नगर उमापूर येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने हातभट्टी दारू विक्री अड्ड्यावर छापा टाकून १७ हजार रुपयांचा हातभट्टी दारूचा मुद्देमाल जप्त केला आहे. अंकुश दीपाचंद जाधव (रा.गणेश नगर उमापूर, ता.गेवराई, जि.बीड) असे हातभट्टी दारू तयार करून



विक्री करणाऱ्याचे नाव आहे. त्याविरुद्ध चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई (दि.३० एप्रिल) रोजी दुपारी केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मुरकुटे हे पथकासह चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील उमापूर येथे पेट्रोलिंग करत असताना, गुप्त बातमीदारांनी माहिती दिली की, एक इसम रसायनांच्या सहाय्याने हातभट्टी दारू तयार करून विक्री करत आहे. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आज त्याठिकाणी छापा मारला असता, आरोपी तिथे गुळ मिश्रित रसायनाचे सहाय्याने हातभट्टी दारू तयार करत असताना मिळून आल्याने त्याच्या ताब्यातून १७ हजार रुपयांचा रसायन व तयार हातभट्टी दारू जप्त करून आरोपींविरोधात चकलांबा पोलीस ठाण्यात दारू बंदी कायदा अन्वये नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरील कारवाई ही पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष साबळे, पोलीस उपनिरीक्षक सिध्देश्वर मुरकुटे, सफौ तुळशिराम जगताप, पोह चव्हाण, विकास राठोड, बाळु सानप, चालक उलगे यांनी केली आहे.

# पाण्याच्या टाकीत लपून बसलेल्या चोरट्याला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

## गेवराई पोलिसांकडून गुन्हेगारांच्या टोळीचा पर्दाफाश

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात मागील आठवड्यापासून चोरीच्या घटना घडत होत्या. टॉवरच्या बॅटऱ्या तसेच रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांचे साहित्य अशा चोरीच्या घटना घडत होत्या. याची माहिती गेवराई पोलिसांना मिळताच मोठ्या शिताफीने चोरी करणाऱ्या टिळीचा पर्दाफाश गेवराई पोलीसांनी केला आहे. तुम्हाला दारूसह जेवणाची पार्टी देतो, असे म्हणत दोघांना सोबत घेऊन, त्यांच्या मदतीने टॉवर व वाहनांच्या बॅटऱ्या व साहित्याची चोरी ही टोळी करत होती. गेवराई पोलिसांनी मोठ्या शिताफीने या टोळीचा पर्दाफाश केला आहे. यातील मुख्य आरोपीला पकडायला गेल्यावर आरोपी हा पाण्याच्या टाकीत लपून बसला होता. केवळ श्वास घेता येईल, एवढे तोंड त्याने वर केले होते. तसेच चोरी करायला जाताना बायकोलाही तो खोटा बोलल्याचे समोर आले आहे.



भीमा लक्ष्मण मस्के (वय ३७ रा.बलभीमनगर, बीड) मसू हनुमंत ताकतोडे (वय २२ रा.चांदणे वस्ती, पेठबीड) आणि सुरेश उद्धव चांदणे (वय ३४ रा.मांगवाडा, पेठबीड) अशी पकडलेल्या तीन आरोपींची नावे आहेत. यातील भीम हा टोळीचा मुख्य म्होरक्या आहे. याच्यावर घरफोडी, चोरी, लुटमार आदी प्रकारचे गुन्हे दाखल आहे.

आष्टी पोलीस ठाण्यातील कोठडीतूनही त्याने एकदा धूम ठोकली होती. पोलिसांनी कारवाई केल्यावर तो काही दिवस शांत होता. परंतु सध्या तो पुन्हा सक्रिय झाला होता. गेवराई तालुक्यात मागील आठवड्यापासून टॉवरच्या बॅटऱ्या तसेच रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांचे साहित्य चोरीच्या घटना वाढल्या होत्या. याची माहिती गेवराई पोलिसांना मिळतात त्यांनी सापळा लावला असता, भीमा हा बीड मधील घरी असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धाव घेतली घरात झडती घेतली परंतु तो मिळाला नाही. त्याचा मोबाईल, चप्पल असतानाही तो मिळत नसल्याने पोलिसांना संशय आला, अखेर पोलिसांनी टोपण लावलेली पाण्याची टाकी तपासली असतात, त्यात भीमा असल्याचे दिसले, पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्यावर त्याच्या इतर दोन साथीदारांनाही बेड्या ठोकल्या आहेत हे तीनही आरोपी सध्या पोलीस कोठडीत आहेत.

# बीड जिल्ह्यातील परिवर्तनासाठी प्रत्येकाचा उंबरा झिजवणार - पुजा मोरे

गेवराई (प्रतिनिधी)

शेतकर्यांनी ओळखले पाहीजे. बजरंग सोनवणे यांना यावेळी गेवराई आणि माजलगाव मतदारसंघातून जास्तीत जास्त लीडने निवडून द्या, शेतकर्यांचा ऊस बांधावर वाळणार नाही, याची काळजी येणार्या काळात बजरंग बप्पा सोनवणे घेतील, असा विश्वास देखील पुजाताई मोरे यांनी व्यक्त केला आहे. गेवराई मतदारसंघात जे कोणी राजकारण करू पाहतात त्यांना बजरंग बप्पाच्या रुपाने तगडा प्रतिस्पर्धी मिळणार आहे. त्यामुळे बजरंग बप्पा सोनवणे यांच्या विजयासाठी गेवराई विधानसभा म तदारसंघातील प्रत्येक उंबरा झिजवून त्यांच्या विजयासाठी सर्वाधिक मताधिक्य देणार असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पुजाताई मोरे यांनी केले आहे.ताकडगाव, गोविंदवाडी, मन्यारवाडी, मानमोडी, सिंदखेड, चीखली,वडगांव, सुशी, कवडगांव, बंगालीपिंपळा, साठेवाडी, कोळगांव, काजळा, तांदळा,सैदापुर, शेकटा,मादळमोही, मुळूकवाडी, कुंभारवाडी, वंजारवाडी, या ठिकाणी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ त्या बोलत होत्या. पुढे बोलताना त्या म्हणाल्या, बीड जिल्ह्यातील शेतकर्यांचा आर्थिक विकास साधण्याचे काम बजरंग बप्पांनी त्यांच्या दोन्ही कारखान्याच्या माध्यमातून केले आहे. केज, अंबाजोगाई, परळी, बीड,



माजलगाव या भागातील ऊस उत्पादक शेतकर्यांना बजरंग बप्पांच्या कारखान्याची खूप मोठी मदत झाली आहे. एका वर्षी अतिरिक्त ऊस झाल्याने माजलगाव तालुक्यात त्याचा मोठा फटका बसला. पण त्यासाठी बजरंग बप्पांचा दोष नाही. धारूरचा घाट अरूंद ठेवून तेथून ट्रॅक्टरने ऊसाची वाहतूक होऊ नये, यासाठी कोण प्रयत्न करतंय? का म्हणून तुम्ही शेतकर्यांच्या उसासाठी आडवे येत आहात? माजलगावच्या ऊस उत्पादकांना ज्यादा भाव मि ळाला तर आपल्याला देखील जादा भाव द्यावा लागेल, असे वाटत असल्यानेच काही स्थानिक नेत्यांनी धारूरच्या घाटातून ऊस नेता येणार नाही, अशा प्रकारचे काम केले. त्यामुळे माजलगावच्या शेतकर्यांचा ऊस गेला नाही, किंवा बजरंग बप्पांनी नेला नाही यावर कोणीही विश्वास ठेवू नये. ऊस त्यांनी घेऊन जावू नये म्हणून बजरंग बाप्पाला धारूरच्या घाटाखाली उतरून न देणारे माजलगावच्या त्या नेत्यांना मिळेल. ऋयेथील कारखानदारांनी आम च्या घामाचे पैसे हडपले. रिकव्हरी चोरण्याचे पाप केले. त्यामुळे आमच्या उसाला कधी जादा दरच मिळालेला नाही. हे थांबवायचे असेल तर बजरंग बप्पा सोनवणे हे आपल्यासाठी उत्तम पर्याय आहेत असे देखील पुजाताई मोरे म्हणाल्या.



# मनोज जरांगे पाटील यांच्या आव्हानाला विघनवाडीच्या उमेदवाराचा प्रतिसाद

## सगे सोयऱ्याच्या अंमलबजावणीसाठी संसदेत आवाज उठविण्याचे दिले वचन

## लोकसभेसाठी केला नामांकन अर्ज दाखल

प्रशांत बाफना । शिरुरकासार

मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून सातत्याने लढणारे आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आव्हानाला तालुक्यातील विघनवाडी येथील तरुणाने प्रतिसाद दिला आहे.देशाच्या सर्वोच्च सभागृहात सगे सोयऱ्याच्या अंमलबजावणीसाठी मराठा समाजाला जो उमेदवार वचननामा देईल त्याच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन जरांगे पाटील यांनी केले होते.त्या अनुषंगाने तालुक्यातील विघनवाडी येथील गोकुळ

बापूराव सवासे यांनी आपला लोकसभेचा उमेदवारी अर्ज दाखल केला असून स्टॅम्प पेपर वर तशा प्रकारचे शपथपत्र लिहून दिले आहे.नारायण गडावर नगद नारायण महारांजाचे आर्शिवाद घेत बाँड पेपर दाखवत प्रचाराचा नारळ वाढवला.यावेळी सवासे यांच्यासह त्यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काय आहे वचननामा

गोकुळ सवासे यांनी आपल्या वचननाम्यात जनतेला लिहून दिले आहे की,मी लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्यानंतर मराठा,मुस्लिम समाजासह बारा बलुतेदार आणि वंचित समाजाला आरक्षण मिळावे म्हणून प्रयत्न करणार आहे.तसेच मराठा समाजाला सगे सोयऱ्यासह सामाजिक व शैक्षणिक आरक्षण मिळण्यासाठी आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ते ज्या सूचना देतील त्यानुसार देशाच्या संसदेत आवाज उठवून समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे.

पाटलांच्या आव्हानाला एकमेव प्रतिसाद

जरांगे पाटील यांनी उमेदवारांना समाजाच्या आरक्षणासाठी आणि सगे सोयरे कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शपथपत्राचे आवाहन केले होते.त्यानुसार गोकुळ सवासे या एकमेव लोकसभा निवडणुकीच्या उमेदवाराने त्यांच्या आव्हानाला प्रतिसाद दिला आहे.या वरुन गोकुळ सवासे यांची समाजाप्रती असलेली निष्ठा दिसून येते.

# ज्यांनी आरक्षणासाठी खस्ता खाल्ल्या त्यांच्या पाठीमागे उभा रहा

## राजेंद्र होके यांचे प्रतिपादन

माजलगाव (प्रतिनिधी)

**आज मराठा आरक्षणाच्या तापलेल्या तव्यावर अनेकांना आपली राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे. परंतु मराठा समाजाच्या तरुणांनी कोणाच्याही मागे वाहवत न जाता ज्यांनी मराठा आरक्षण प्रश्नासाठी खस्ता खाल्या, आपलं आयुष्य पणाला लावलं, जेल भोगलं, आपलं कुटूंब वार्यावर सोडून सहा सहा महिने फरार राहावं लागलं त्याचं योगदान लक्षात घेऊनच मतदान करावं. हाच राजेंद्र होके आरक्षण प्रश्नासाठी रस्त्यावर होता. हाच राजेंद्र होके तुम्ही आवाज दिला तर लगेच धावत येईल, त्यामुळे आपलं मतदान माझ्या दुरदर्शन अर्थात टीव्हीला या चिन्हाला द्या, अशी कळकळीची विनंती अपक्ष उमेदवार राजेंद्र होके पाटील यांनी केली आहे.**

गावागावात आयोजित कॉर्नर बैठकीत युवकांशी संवाद साधताना होके पाटील बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, मराठा समाजाला आरक्षणापासून वंचित ठेवण्याचं खरं पाप काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने केले आहे. मराठा समाज हा कुणबी असताना देखील इतके वर्ष त्यांनी हे लपवून ठेवत मराठा समाजाला ओबीसीच्या लाभापासून वंचित ठेवले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आम्हाला कुणबी म्हणवून घेण्यासाठी मदत केली परंतु त्यासाठी आंतरवाली सराटीत आमच्या आया बहीणींला लाठ्या काठ्या खाव्या लागल्या. आमची मागणी सगे सोयरेंची असताना तुम्ही १० टक्क्याचा ५० टक्क्यांच्या वरतून कोटा देता, त्यामुळे या सरकारने देखील आमची फसवणूक केली. वरतून आमच्या मागे एसआयटी लावली. मराठा समाज हे कदापि विसरणार नाही. पण आज शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे लोक जणू मराठा आरक्षण आंदोलनात ह्यांनी स्वतःला झोकून दिलं याप्रमाणे मराठा समाजाला मतं मागत आहेत. त्यांची मतं ग्राह्य धरली जात आहेत. मराठा समाज म्हणजे शरद पवार यांच्या पक्षाची मक्तेदारी नाही. समाजाच्या तरुणांची माथी भडकावून त्यांना जर कोणी आमचा पक्षच तुमचा तारणहार असे सांगत असेल तर अशा लोकांपासून मराठा समाजाने त्यांच्यापासून चार हात दूर रहावे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने केवळ आणि केवळ कारखानदार, संस्थाचालकांचे हित बघीतले. सामान्य मराठा समाजाला शिक्षण, नोकरी यापासून वंचित ठेवण्याचं पाप केलं आहे. त्यामुळे समाजाने त्यांच्या नादी लागू नये. मराठा समाजासाठी ना भाजपाने चांगले काम केले ना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवारांच्या पक्षाने. त्यामुळे दोघेही मराठा समाजाचे दुश्मन आहेत. मराठा समाजाचा आवाज संसदेत बुलंद



करण्यासाठी माझ्या दुरदर्शन संच या चिन्हासमोरील बटन दाबून मला विजयी करावे असे आवाहन देखील राजेंद्र होके पाटील यांनी शहरात आयोजित कॉर्नर बैठकीत केले.

# महिंद्रा ट्रॅक्टर कंपनीतील कर्मचारी झाला अभिनेता-निर्माता

## पहिला हिंदी चित्रपट लोरी ३ मे रोजी होतोय प्रदर्शित

बीड (प्रतिनिधी)

चित्रपटात अभिनय करावा, चित्रपट निर्माण करावा अशी सुप्त इच्छा व स्वप्न मनात बाळगणारे अविनाश कवठणकर यांनी मनातली ही इच्छा पुर्ण केलीच. त्यांनी निर्माण व अभिनय केलेला पहिला हिंदी चित्रपट लोरी येत्या ३ मे रोजी संपूर्ण भारतात प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाला बीड जिल्ह्याचे जावई अल्ताफ दादासाहेब शेख यांनी संगीत दिले असून गाणीही त्यांनीच लिहिली आहेत. लोरी या हिंदी चित्रपटाचे निर्माते व अभिनेते अविनाश कवठणकर मुंबईमध्ये महिंद्रा ट्रॅक्टर या कंपनीत साधारण कर्मचारी म्हणून १९९१ सालापासून काम करतात. अविनाश हे लहानपणापासूनच स्वप्न पाहायचे. रूपेरी पडद्यावर हिरो व्हावे. चित्रपट निर्मिती करावी. पण घरची परिस्थिती हलाखीची होती. आई सतत आजारी असायची. आईच्या तब्येतीची जास्त काळजी घ्यावी लागायची. यामुळे त्यांनी लग्न सुद्धा केले नाही. आईची सेवा करत शिक्षण घेतले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रपंच चालविण्यासाठी महिंद्रा ट्रॅक्टर कंपनीत नोकरी पत्करली. पण चित्रपट निर्माण करण्याचे व अभिनय करण्याचे स्वप्न उराशी बाळगून होतेच. त्या स्वप्नाचा पाठलाग सुरूच होता.



दरम्यान आज त्यांचे मित्र असलेले राजू रेवणकर यांच्याशी त्यांची ओळख झाली आणि त्यांनी त्यांच्या सोबत मिळून साई राम - क्रिएटिव वर्ल्ड या कंपनीची स्थापना करून लोरी या हिंदी चित्रपटाची निर्मिती केली आणि मुख्य अभिनेता म्हणून त्यात अभिनय सुद्धा केला. चित्रपट निर्माण करताना त्यांना खूप अडचणी आल्या. सर्व अडचणींवर मात करत त्यांनी चित्रपट पूर्ण केला. अविनाश कवठणकर यांनी लहानपणापासून पाहिलेले स्वप्न शेवटी पुर्ण झाले असून त्यांनी निर्माण केलेला पहिला हिंदी चित्रपट लोरी येत्या दिनांक ३ मे २०२४ शुक्रवार रोजी संपूर्ण भारतात प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन व गीत लेखन बीड चे जावई सुप्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांनी केले आहे. सुधीर कुमार यांच्या सोबत मिळून संगीत दिले आहे. गाणी सुप्रसिद्ध गायक सुरेश वाडकर, स्वप्निल बांदोडकर, प्रियांका बर्वे, उर्मिला धनगर, अंजली गायकवाड यांनी गायली आहेत. अविनाश कवठणकर यांचे स्वप्न पूर्ण करणारा लोरी हा हिंदी चित्रपट ३ मे रोजी आपल्या जवळच्या चित्रपटगृहात प्रदर्शित होत असून चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद, गीते ह्रदयस्पर्शी असून संगीत ही उच्च दर्जाचे आहे. सर्व कलाकारांनी अभिनय ही मन लावून केल्याने चित्रपट रसिकांना लोरी हा हिंदी चित्रपट नक्कीच आवडेल असा विश्वास अविनाश कवठणकर यांनी व्यक्त केला आहे.



आज जामखेड येथे शिवसेनेचे आष्टी तालुक्याचे तालुकाप्रमुख सूभाषजी राऊत यांच्या मुलाच्या लग्न समारंभ प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमूख परमेश्वर सातपुते सर यांनी उपस्थित राहुन चि.वैभव व चि.सौ.का राधीका यांना पुढील वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, पाटोदा तालुका प्रमुख मुकूंद शिंदे, आष्टी विधानसभा प्रमुख नवनाथ अटूळे, कांग्रेस चे तालुका अध्यक्ष रवी काका ढोबळे,आष्टी शहर प्रमुख महेश एकशिंगे, युवा सेना तालुका प्रमुख शिवप्रसाद जाधव,देविसिंग भिसेन,अजय गायकवाड,रामदास मोहिते, आकाश पिंगळे, ज्ञानदेव मुटकुळे,अखिल पठाण आदी सर्व उपस्थित होते..!!

# नगद नारायण महाराजांचे आर्शिवाद घेऊन अपक्ष उमेदवार गोकुळ सवासे ऊतरले मैदानात

प्रशांत बाफना ।शिरुरकासार

बीड लोकसभेचे अपक्ष ऊमेदवार गोकुळ सवासे यांनी नारायण गडावर येऊन नगद नारायण महाराजांच्या चरणी नतमस्तक होत गडाचे महंत शिवाजी महाराजांचे आर्शिवाद घेऊन लोकसभेच्या आखाड्यात ऊतरले आहेत.यावेळी त्यांनी प्रचाराचा नारळ वाढवत त्यांनी भव्य शक्ती प्रदर्शन करीत आपली ताकद दाखवण्याचा प्रयत्न केला.गेल्या कित्येक वर्षापासुन सामाजिक चळवळीत काम करत आसलेले गोकुळ सवासे यांच्याकडे तरुण वर्ग आकर्षित होताना दिसत आहे.तसेच ते मराठा चेहरा म्हणून देखिल पुढे येत आसल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये आनंद होताना दिसत आहे.बीड लोकसभा सार्वत्रिक निवडनुकीसाठी गोकुळ बापुराव सवासे यांनी २४ तारखेला आपला ऊमेद्वारी अर्ज दाखल केला आहे.यावेळी त्यांनी जरांगे पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे जो ऊमेद्वार शपथपत्राव्दारे सगेसोयरे बद्दल व मराठा आरक्षणा संदर्भात लिहुन देईल त्याला सहकार्य करण्याचे सांगितले आसल्याचे गोकुळ सवासे यांनी म्हटले आहे.त्या अणुषंगाने सवासे



यांनी एक शपथपत्र बनवले आसुन त्यामध्ये मी बीड लोकसभेचा ऊमेद्वार आसुन निवडनुकीचा वचननामा शपथपत्राद्वारे वचन देतो की जिल्ह्यातील सर्व समाज बाधवांचे आरक्षणा बाबतचे तसेच मराठा समाजाचे सगेसोयरे बाबत सामाजिक व शैक्षणिक आरक्षण मिळण्यासाठी देशाच्या सर्वोच्च सभागृहात सगेसोयरेची अमलबंजावनी होण्यासाठी आरक्षणाचे मुद्दे मांडुन आवाज ऊठवेल यासह आदी मुद्दे सवासे यांनी आपल्या शपथ पत्राद्वारे मांडले आहेत.गडावर आल्यानतंर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी म्हटले की मी जनतेशी एकनिष्ट असुन कोणत्याही जातीपातीचा नाही.तर मी एक स्वाभीमानी कार्यकर्ता म्हणून निवडनुकीच्या मैदानात उतरलो आहे.विकासाला महत्व देणारा सामान्य घरातील सामान्य घरातील मुलगा आसल्याचे सांगुन मला नेहमीच सामान्य जनते बद्दलचा कळवळा व त्यांच्या प्रश्नांची जान राहीली आसल्याचे गोकुळ सवासे म्हणाले.

# गेवराई तालुक्यातील पाच हजार उसतोड कामगार कुटुंबाचे स्थलांतर थांबवू : कडूदास कांबळे

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील मौजे मादळमोही येथे दिनांक एक मे २० २४ रोजी मादळमोही येथील सावता माळी मंदिरामध्ये एक मे महाराष्ट्र कामगार दिनानिमित्त महिला कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते क्रांती महिला व संघटित कामगार युनियन महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने कामगार दिनानिमित्त कामगार महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी क्रांती महिला असंघटित कामगार संघटनेच्या महाराष्ट्राचे अध्यक्ष शाहीन पठाण यांचे अध्यक्ष खाली हा मेळावा आयोजित करण्यात आला होता या मेळाव्याच्या प्रमुख पाहुणे म्हणून क्रांती महिला संघटनेच्या मराठवाडा अध्यक्ष मंगलताई राठोड तसेच बीड जिल्हाध्यक्ष कविता डोंगरे तसेच शकुंतला गुंगाचे मंदा चौधरी शेख शमीम शेख शिकंदर शितलताई रोहिणी अंजुम पठाण या मेळाव्यास विशेष उपस्थिती म्हणून ग्रामपंचायत सरपंच विकास समितीचे व पत्रकार सखाराम पोहिकर हे सर्व मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते यावेळी आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता डोंगरे यांनी केले यावेळी आलेल्या सर्व महिला कामगारांना मार्गदर्शन करताना क्रांती महिला असंघटित कामगार युनियन महाराष्ट्र राज्य संघटनेचे मार्गदर्शक कडूदास कांबळे यांनी प्रभावीपणे असे सांगितले की रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून गेवराई तालुक्यातील ५००० ऊसतोड कामगारांचे स्थलांतर थांबू असे प्रतिपादन क्रांती महिला संघटित कामगार युनियनचे महाराष्ट्र राज्य समय कांबळे यांनी जागतिक कामगार दिनानिमित्त आयोजित केलेल्या महिला मेळाव्यात आपले मत व्यक्त करताना असे सांगितले जागतिक कामगार दिनानिमित्त आयोजित महिला मेळावा संघटनेच्या वतीने मादळमोही येथे संपन्न झाला यावेळी संघटनेचे राज्य संघटक शकुंतला



गुंगाशी मंदाताई चौधरी शितल पंढरी यांनीही यावेळी उपस्थित महिलांना अनमोल असे मार्गदर्शन केले गेवराई तालुक्यातील असंघटित कामगार महिला पुरुषांना रोजगाराची संधी नसल्यामुळे गाव सोडून बाहेर गावी मुलाबाळांना घेऊन ऊस तोडणी ला जावे लागते देवळा तालुक्यातील ऊसतोड कामगारांचा वनवास संपवण्यासाठी क्रांती महिला असंघटित कामगार युनियन रोजगार हमी योजना कायद्याच्या माध्यमातून येथील मजुरांना रोजगार मिळवून देईल असे क्रांती असंघटित कामगार युनियनच्या महाराष्ट्राचे अध्यक्ष शाईन पठाण यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले पुढील काळामध्ये रोजगार हमी कामावर मजुरांना आठशे रुपये प्रति दिन आठ तासाची मजुरी मिळावी यासाठी संघटना काम करणार आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले क्रांती महिला असंघटित कामगार योजनांचे अध्यक्षा शाहीन पठाण यांनी असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या अडचणी विषयी चर्चा करून संघटनात्मक बांधणीवर भर दिला आगामी एक वर्षाच्या कालावधीमध्ये गेवराई तालुक्यात किमान पाच हजार महिलांना संघटनेचे सभासद करून त्यांना रोजगार मिळवून देऊ अशा संकल्पही यावेळी करण्यात आला मादळमोही येथील क्रांती महिला संघटित कामगार युनियनच्या कार्यकर्त्या मंगल काकू भोपळे शाहीन युसुफ पठाण रिजवाना बद्रूनिता पठाण गयाबाई मेंडके विमलताई धुरंधरे तळीभाई ससाने आदी प्रमुख महिला कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रांती महिला असंघटित कामगार युनियनच्या कार्यकर्त्या कविता डोंगरे यांनी सूत्रसंचालन केले तर आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्यांचे महिलांचे आभार प्रदर्शन मनीषा शरणांगत यांनी आभार मानून कार्यक्रम संपला असे जाहीर केले

# आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास निदर्शनास आणून द्यावे : निवडणूक निरीक्षक अजीमूल हक

गेवराई । प्रतिनिधी

आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहन बीड मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक अजीमूल हक यांनी मंगळवारी चिन्ह वाटपाच्या समयी राजकीय पक्षांना केले. राजकीय पक्षांची चिन्ह वाटपाची बैठक तसेच राजकीय पक्षांनी यापुढे घ्यावयाची काळजी या संदर्भातील सूचनांची माहिती देण्याकरिता जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे आणि निवडणूक निरीक्षक अजीमूल हक यांच्या प्रमुख उपस्थितीत बोलविण्यात आली होती. त्यावेळी श्री हक यांनी ही माहिती दिली. यांनी सांगितले सायंकाळी ५ ते ६ या वेळेत शासकीय विश्रामगृह येथे राहणार असून माझ्याशी थेट संपर्क करता येईल. यावेळी त्यांनी त्यांचा संपर्क क्रमांक ९४०४५९२५११ राजकीय पक्षांना दिला आहे.निवडणुकीच्या काळात प्रत्येक घरावर एका पक्षाचे तीन अथवा तीन पक्षाचे एक-एक ध्वज लावता येतील.



गाड्यांवर बॅनर लावता येणार नाही. स्टिकर लावण्यास हरकत नाही. मात्र पुर्वपरवानगी शिवाय लावू नये. निवडणूक काळात आदर्श आचारसंहिताचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून त्याला सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिलेली आहे. श्री हक यांनी काही मुद्दे आवर्जून सांगितले यामध्ये कोणत्याही पक्षाने तात्पुरत्या स्वरूपात सुरू केलेल्या संपर्क कार्यालयाबाबतची माहिती निवडणूक विभागास द्यावी. संबंधित कार्यालय हे मतदान केंद्राच्या २०० किलोमीटरच्या परिसरात नसावे. तसेच कुठल्याही खाजगी अथवा शासकीय रुग्णालयाच्या शेजारी नसावे. ध्वनी प्रदूषण होणार नाही याची काळजी राजकीय पक्षांनी घ्यावी.प्रचार प्रसार करताना संरक्षण विभागातील कुठलाही शस्त्रसामुग्री अथवा सैनिकी चिन्हाचा वापर करू नये. प्रचारामध्ये बालकांचा उपयोग होणार नाही याची दक्षता घ्यावी. बाल कामगारांच्या कायद्याच्या विरोधात असल्याचे सांगितले. भारत शासनाने प्लास्टिक बंदी केली असून प्लास्टिकचा वापर प्रचारादरम्यान करू नये. सीव्हीजीएल प चा वापर करून आचारसंहितेचा भंग झाल्यास निदर्शनास आणून द्यावे हा प सर्वांसाठी उपयोगी असून १०० मिनिटाच्या आत प वर तक्रार केल्यास कारवाई करण्यात येते. नागरिकांच्या मूलभूत अधिकाऱ्यांना प्रचारादरम्यान हनन होणार नाही, याची दक्षता घ्यावी. अशा मौलिक सूचना श्री हक यांनी यावेळी दिल्या.



## बजरंग बप्पा सोनवणे यांच्या विजयासाठी पाटोदा तालुक्यातील शिवसैनिकांनी वज्रमूठ आवळली.शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर

आज पाटोदा येथे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत पाटोदा तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची व कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली व नवीन शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या निवडी केल्या व कोणतेही मतभेद न करता जोमाने कामाला सुरुवात करावी असे सांगितले.. याप्रसंगी बोलताना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते म्हणाले की भाजपातील मोदी हुकूमशाहीला,सर्व गद्दारांना व बीड जिल्ह्यातील घराणेशाहीला सत्तेतून हाकलण्यासाठी सर्व शिवसैनिकांनी महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे सर्व पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना ठणकावून सांगितले. (नवीन पदाधिकारी नियुक्त केले ) १.अशोक मधुकर पवार (उपतालुकाप्रमुख पाटोदा) २.सोमनाथ नानासाहेब लवूळ (पाटोदा उपतालुकाप्रमुख) ३.सचिन हरीभाऊ वनवे (उपतालुकाप्रमुख पाटोदा) ४.अनिल अश्रुबा तांबे (उपतालुकाप्रमुख पाटोदा) ५.रामेश्वर महादेव नागरगोजे (शेतकरी सेना तालुका प्रमुख पाटोदा) ६.संतोष तांबे (विभाग प्रमुख पाटोदा) ७.फारूख सय्यद (अल्पसंख्याक सेल तालुका प्रमुख पाटोदा). ८.कैलास काशीद ( विभाग प्रमुख पाटोदा) ९. प्रतिभा हनुमंत वनवे (महिला आघाडी तालुका प्रमुख) १०. कल्पना कैलास काशीद (महिला आघाडी शहर प्रमुख) याप्रसंगी जिल्हासंघटक रतन तात्या गुजर, पाटोदा तालुका प्रमुख मुकूंदजी शिंदे,युवासेना शहर प्रमुख अजिंक्य डोरले,अजय गायकवाड व सर्व पदाधिकारी उपस्तिथ होते..!!

# लिंबागणेश येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

लिंबागणेश (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे दि.३० मंगळवार रोजी राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सरपंच बालासाहेब जाधव यांच्या हस्ते सकाळी पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. तथागत भगवान गौतम बुद्ध,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीराव फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष अरूण निर्मळ यांनी उपाध्यक्ष अमोल वक्ते यांनी सुत्रसंचलन केले.सोनु निर्मळ यांनी आभारप्रदर्शन केले.या कार्यक्रमात महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी शिका संघटित व्हा, संघर्ष करा हा मुलमंत्र देऊन देशातील उपेक्षित समुहातील समाज बांधवांना आपल्या हक्क व अधिकारासाठी आवाज उठवण्याची व लढा उभारण्याची ताकद निर्माण करून देण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केल्याचे प्रतिपादन सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी केले.



सायंकाळी फुलांनी आणि निळ्या ध्वजांनी सजवलेल्या जीप मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले.त्यानंतर भालचंद्र माध्यमिक विद्यालय पासुन सुरूवात करत संपूर्ण गावातुन संगीत वाद्यांच्या गजरात मोठ्या उत्साहात मिरवणूक काढण्यात आली.भिमगीतांवर वाद्यांच्या तालावर तरूणाईने ठेका धरला भिमसैनिक आबालवृद्ध महिला पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जयंती निमित्त वृक्षारोपण, रक्तदान शिबीर तसेच व्याख्यान, गायनाच्या विविध कार्यक्रमांचे ३ दिवसीय आयोजन करण्यात आले आहे.जयंती यशस्वीतेसाठी जितेंद्र निर्मळ, प्रा.लेहनाजी गायकवाड, सुरेश निर्मळ,अमोल निर्मळ,रिंकु निर्मळ, बालाजी निर्मळ तुकाराम गायकवाड,नाना निर्मळ स्वप्निल वक्ते,बाळु निर्मळ, कैलास गायकवाड, पप्पु आवसरे,पोपट निर्मळ,बापु थोरात, पप्पु निर्मळ, सुमित निर्मळ, स्वप्निल निर्मळ, प्रकाश निर्मळ, ज्ञानोबा निर्मळ,सनी जाधव, रणजित साळुंके आदिंनी परीश्रम घेतले. मिरवणूक दरम्यान नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे,लिंबागणेश पोलिस चौकीचे जमादार बाबासाहेब डोंगरे पोलिस बंदोबस्तासाठी उपस्थित होते.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT